# पूर्वजन्मीच्या स्मृती..

• नी. र. वऱ्हाडपांडे

माणूस चिकित्सा किती करतो हे चिकित्सेच्या विषयाशी त्याच्या भावना किती निगडित आहेत यावरही अवलंबून आहे. आपल्याला असाध्य रोग झाला आहे यावर माणूस फार चिकित्सा केल्यानंतर विश्वास ठेवतो उलट 'तसे काही नाही' हे मत तपासून पाहण्याचा प्रयत्न करत नाही.

**प्लँचेट** ही एक तिपाई असते. या तिपाईच्या साहाय्याने मृतात्म्याशी संपर्क साधता येतो असा दावा सांगण्यात आला आहे. ज्या व्यक्तीला एखाद्या मृतात्म्याशी संपर्क साधायचा असेल तिने या प्लँचेटवर हात ठेवून व मृतात्म्याचे स्मरण करुन त्याला बोलावयाचे असते. थोड्या वेळाने तो मृतात्मा त्या व्यक्तिच्या बोटात शिरतो व ती तिपाई हलवू लागतो. तिपाईचे पाय थांबतात. त्या अक्षरांद्वारे मृतात्म्याला आपले विचार व्यक्त करता येतात असा पुष्कळ लोकांचा विश्वास आहे व ते आपले या बाबतीतले अनुभव सांगत असतात.

प्लँचेटचे काही प्रयोग मी बऱ्याच वर्षापूर्वी स्वतः पाहिले आहेत, ज्यांचे प्रयोग पाहिले नाहीत अशा लोकांचे अनुभव ऐकले आहेत व या तज्ज्ञांचे लिखाण व व्याख्याने देखील ऐकली आहेत. या सर्वांचा निष्कर्ष काढून खालील प्रश्नांची उत्तरे देण्याचा या लेखात प्रयत्न करीत आहे.

१) प्लँचेटवर हात फिरवणारे लोक स्वतःच तो हात फिरवून आत्म्याने हात फिरवला म्हणून थापा मारतात काय?


२) काही लोकांचा हात बुद्ध्या न फिरविता आपोआप फिरत असेल तर तो मृतात्म्याने फिरविला असे मानता येईल काय ?

३) मृतात्म्याने हात फिरविला नसून आपोआप फिरत असेल तर त्याचे खरे कारण काय ?

**स्वतः केले आत्म्याच्या नावे सांगितले !**

यापैकी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात मी सांगू शकतो की मी पाहिलेल्या पुष्कळशा व्यक्ती स्वतःच प्लँचेट फिरवीत यात मला शंका नाही. त्या पूर्णपणे सावध असून भानरहित झाल्याचे त्यांच्यात कोणतेही लक्षण दिसत नव्हते. त्या भोवतालच्या लोकांशी गप्पा मारीत होत्या व त्यांच्या द्वारा मिळालेली उत्तरे त्यांच्या स्वतःच्या विचारानुरुप होती. त्यातली निदान काही उत्तरे तरी मृतात्म्यांच्या इतरांशी ज्ञात असलेल्या विचारांशी पूर्णपणे विसंगत होती.

मला आठवणाऱ्या एका प्रसंगी माझ्या एका मित्राची बहीण प्लँचेटवर आपल्या आईला बोलविते व तिला ''सून आवडते



का?'' म्हणून विचारले. प्लँचेटवर ''नाही'' असे उत्तर आले. या उत्तराचे मुलगा व सून या दोघांनाही आश्चर्य वाटले कारण मृत होण्यापूर्वी सून आवडत नाही असे दशर्विणारे कोणतेच वर्तन सासुबाईकडून घडले नव्हते.

१९२१ साली प्लँचेटचा प्रचार बराच वाढला होता. याच साली म. गांधींनी आपली असहकाराची चळवळ सुरू केली होती. १९२० साली लो. टिळकांचे निधन झाले होते. राजकीय विषयांवरील टिळकांचे विचार काय आहेत याबद्दल कुतूहल बाळगणारा एक मोठा वर्ग होता. त्याला लो. टिळकांचे गांधींच्या चळवळीबद्दल काय मत आहे हे समजून घेण्याची इच्छा होती. पण या वर्गात गांधीभक्त व गांधीविरोधी असे दोन वर्ग होते गांधीभक्ताने टिळकांच्या आत्म्याला प्लँचेटवर बोलावले की तो आत्मा ''गांधींच्या चळवळीत लाखोंनी सामील व्हा'' असे सांगत असे व गांधीविरोध्यांनी बोलावले की ''या चळवळीशी अजिबात संबंध ठेवू नका'' असे सांगत असे.

वरील दोन उदाहरणावरुन प्लँचेटवर मृतात्म्याचे विचार प्रकट होत नसून प्लँचेटवर बसणाऱ्या जिवंत व्यक्तिचेच विचार प्रकट होतात हे स्पष्ट दिसते.

१९४६ साली पाकिस्तान झाले तेव्हा संघाचे एक प्रचारक फारच दुखावले गेले व या दुःखाचा भार असह्य होऊन भ्रमिष्टपणातच

त्यांचा अंत झाला. एका उमद्या तरुणाचा असा अंत झाला म्हणून त्याच्या सहकाऱ्यांना फार दु:ख झाले व त्याच्या आत्म्याशी संपर्क साधण्याची इच्छा झाली. तेव्हा त्यांनी प्लँचेटचा आश्रय घेतला. प्लँचेटवर त्या आत्म्याने जिवंतपणी सांगितलेलेच सर्व विचार सांगितले, पण हे प्लँचेट वापरणारे वारंवार या गोष्टींवर भर देतात की त्या आत्म्याने प्लँचेट ज्या खोलीत ठेवले होते तिच्या शेजारच्या खोलीत विजय मर्चंट या क्रिकेटपटूचा फोटो आहे हे सांगितले व ही गोष्ट दिवंगत व्यक्तिला माहीत नव्हती. कारण ती इमारत मुळात तिच्या मृत्यूनंतरची होती.

वस्तुत: यावरुन प्लँचेटवर खरोखरच आत्मा आला होता असे म्हणता येत नाही. उलट प्लँचेटवर बसणारे मृतात्म्याचे सहकारी स्वत:ला माहीत असलेल्या गोष्टीच प्लँचेट फिरवून व्यक्त करीत होते हे स्पष्ट आहे.

प्लँचेटवर बसणाऱ्या काही व्यक्ती मात्र भानावर नसल्यासारख्या भासतात व त्यांचा हात आपोआप फिरत आहे असे पाहणाऱ्याला वाटते. मग अशा उदाहरणात मृतात्मा हात फिरवतो असे मानायचे का?

**स्वंयलेखन :**

याबाबतीत मानसशास्त्रज्ञांनी केलेला खालील प्रयोग मार्गदर्शक ठरावा.

मानसशास्त्रज्ञाने एका व्यक्तीला तू लपविलेली वस्तू मी शोधून काढू शकतो असे सांगितले. प्रयोग करण्यासाठी मानसशास्त्रज्ञाने त्या व्यक्तीला एक पेन खोलीत लपवायला सांगितले व तो खोलीच्या बाहेर गेला. पेन लपविले गेल्यावर तो खोलीत आला व त्याने त्या व्यक्तीला आपले हात धरुन उभे राहायला व थोड्या थोड्या वेळाने काहीतरी हालचाल करायला सांगितले. त्या व्यक्तीच्या डोक्यात पेन लपविलेल्या जागेचाच विचार घोळत होता व त्यामुळे त्याने केलेली कोणतीही हालचाल पेन लपविलेल्या जागेकडेच होत होती. अशी हालचाल होता होता जेव्हा बराच वेळ हालचाल होईना तेव्हा मानसशास्त्रज्ञाने ओळखले की पेन लपविलेली जागा हीच आहे व त्याने लपविलेले पेन उचलले.

या प्रयोगात मानसशास्त्रज्ञ आपल्याला पेनकडे नेत आहे असे त्या व्यक्तिला वाटत होते. वस्तुत: ती व्यक्तीच मानसशास्त्रज्ञाला पेनकडे नेत होती. डोक्यात जो विचार प्रामुख्याने आहे त्याचा आपल्या वागण्यावर परिणाम होत असतो. वस्तुत: फक्त डोक्यात, कोणताच विचार नसतो. डोक्यात अमुक विचार आहे याचा अर्थ घशातील ध्वनिरज्जू त्या विचारांचा अस्फुट उच्चार करीत आहेत. आपले शरीर त्या उच्चारकांच्या अनुकूल हालचाली करण्यास तयार आहे, असाच असतो. तेव्हा प्लँचेटवर काही लोकांचा हात अभावितपणे फिरतो. कारण त्यांच्या डोक्यातील कल्पना हाताद्वारे देखील व्यक्त होत असतात.

म्हणजे जे लोक बुद्धया लबाड्या करीत नाहीत ते देखील अभावितपणे स्वत:च प्लँचेट फिरवीत असतात, मृतात्मा प्लँचेट फिरवीत नसतो.

या प्रकाराला automatic writing म्हणजे स्वयंलेखन असे म्हणतात.

त्याच्या सिद्धीसाठी आवश्यक असणाऱ्या पुराव्याशी व्यस्त प्रमाणात आहे. त्यामुळे स्वत:चे भावनात्मक समाधान करण्यासाठी आत्मवंचना करण्याची प्रवृत्ती सहज आहे. पण केवळ आत्मवंचना नव्हे तर वैयक्तिक लाभासाठी परवंचना करण्यास देखील या क्षेत्रात फार वाव आहे. श्री. श्याम मानव यांनी अशाच काही बुवांचे बिंग फोडले आहे. या बुवाकडे काही लोक काल्पनिक व्यक्तिच्या मृत्यूची कहाणी सांगायला गेले व या काल्पनिक व्यक्तिच्या मृतात्म्याला देखील बुवांनी प्लँचेटवर बोलावले !

प्लँचेट हे स्वयलेखन आहे व स्वयलेखन हे निद्रा व संमोहन यांच्यासारख्या मन:स्थितीत माणूस गेला तरच शक्य होते. या स्थितीचे वैशिष्ट्य हे आहे की त्याचा बाह्य जगाशी असलेला संबंध बव्हंशी तुटलेला असतो, म्हणजे बाह्य जगातून ज्ञानेंद्रियांकडे व कर्मेंद्रियांकडे संदेश जाण्याऐवजी ते मेंदूकडून या इंद्रियांकडे जात असतात. त्यामुळे बाह्य जगात नसलेल्या गोष्टी अर्धवट जागृत मेंदूतून आलेल्या संदेशामुळे अत्यंत विसंगतरीतीने ज्ञानेंद्रियांना दिसतात व त्या खऱ्या आहेत असे समजून वर्तन करण्याची प्रेरणा कर्मेंद्रियांना मिळते. स्वप्नामध्ये पुष्कळ वेळा मेलेल्या व्यक्ती





दिसतात. स्वप्नं पडत असताना जागृतावस्थेतील जगाचे भान पूर्णपणे सुप्त झाले असेल तर अशा स्वप्नात दिसलेली व्यक्ती मेलेली आहे असे भान देखील राहत नाही. त्यामुळे प्लँचेटवर बसून संमोहनावस्थेत गेल्यावर "आपला मृतात्म्याशी संबंध स्थापित झाला आहे" असे वाटू लागले की मृतात्म्याचे जे संदेश त्या व्यक्तिला संभाव्य वाटत असतील त्या संदेशानुसार हात फिरविण्याची प्रेरणा मेंदूकडून मिळू लागते. स्वप्नात दिसणाऱ्या व्यक्तिशी बोलण्याची प्रेरणा मेंदूकडून घशातील ध्वनिरज्जूंना मिळाल्यावर काही लोक झोपेत असताना देखील मोठ्याने बोलतात. त्याच प्रमाणे हात फिरविण्याची क्रिया देखील अभावितपणे घडते.

**सूचनावशता**

त्वरित संमोहनावस्थेत जाणाऱ्या व्यक्ती फार मोठ्या प्रमाणात सूचनावश असतात. संमोहन करण्यासाठी मानसशास्त्रज्ञ "तुमचे डोळे आता जड होत आहेत, तुम्ही आता अमुक ठिकाणी आहात" वगैरे सूचना देत असतो व त्या सर्व अशा व्यक्तींना खऱ्या वाटत असतात.

सूचनावश व्यक्तींना केवळ संमोहनावस्थेत मिळालेल्या सूचनाच खऱ्या वाटतात असे नाही. कोण किती सूचनावश आहे हे जागृतीत देखील कळू शकते. खाली दिलेल्या आकृती पहा.



यात खाली व वर अशा दोन सरळ रेषा आहेत. त्या सारख्याच लांबीच्या आहेत. पण वरची रेषा जास्त लांब आहे असे वाटते. कारण तिच्या टोकावर बाहेर जाणाऱ्या दोन कोणात्मक रेषा आहेत. "खालची रेषा इतके सेंटिमीटर लांब आहे तर वरची त्याहून किती जास्त लांब आहे?" असे विचारले तर जास्त सूचनावश मनुष्य लांबी जास्त वाढवून सांगतो.

**Body sway test of suggestibility** म्हणजे सूचनावशतेची एक शरीरचलन कसोटी आहे. या कसोटीत प्रयोग्य व्यक्तीच्या छातीला एक दोरी बांधलेली असते व तीच दोरी त्याच्या मागच्या यंत्राला बांधलेली असते. तो माणूस पुढे वाकला की तो किती वाकला याचे मापण ते यंत्र करते. "तू पुढे वाकलास" असे एखाद्या वेळी म्हटल्याबरोबरच एखादा माणूस लगेच वाकला नसताही वाकतो तर दुसरा बराच वेळ या सूचनेकडे दुर्लक्ष करतो. एखादा कमी वाकतो तर दुसरा जास्त वाकतो.



सूचना कुणी दिली यावर देखील तिची परिणामकारकता अवलंबून असते. सहकाऱ्याने सूचना दिली तर एखादा माणूस वाकणार नाही पण वरिष्ठाने दिली तर वाकेल. एखादा एक हुद्दा वर असणाऱ्या वरिष्ठाच्या सुचनेला जुमानणार नाही पण दोन हुद्दे वर असणाऱ्या वरिष्ठाने सुचना दिली तर वाकेल. अशा प्रकारे मापन करुन सूचनावशता व संमोहनीयता यांचा संबंध सिद्ध करण्यात आला आहे.

सूचनावशता जास्त असली की चिकित्सकता कमी होत जाते. चिकित्सकतेचा बुद्धिमत्तेशी संबंध नाही. अती बुद्धिमान माणूस देखील अती सूचनावश असेल तर चिकित्साशून्य असू शकतो.

माणूस चिकित्सा किती करतो हे चिकित्सेच्या विषयाशी त्याच्या भावना किती निगडित आहेत यावरही अवलंबून आहे. आपल्याला असाध्य रोग झाला आहे यावर माणूस फार चिकित्सा केल्यानंतर विश्वास ठेवतो उलट 'तसे काही नाही' हे मत तपासून पाहण्याचा प्रयत्न करत नाही.

या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या विरुद्ध चिंतावश लोकांचे वागणे असते. असे लोक स्वतःच्या सुरक्षिततेबद्दलच्या अनेकविध काळज्यांनी ग्रस्त असतात. ''तुझ्या बँकेतल्या खात्यातून कुणीतरी सारे पैसे लंपास केले'' असे त्याला सांगितले तर सांगणारा आपल्याला बनवीत आहे की नाही, बँकेतून पैसे लंपास करणे कितपत सोपे आहे वगैरे संभावनांचा यत्किंचित विचार न करता तो हातातले काम सोडून तत्काळ बँकेत धावत जाईल. एका मोठ्या गणितज्ञावर माझ्या एका मनोवैज्ञानिक सहकाऱ्याने असा प्रयोग केल्याचे मी पाहिले आहे.

**आत्म्याच्या अमरत्वाबद्दल युक्तिवाद**

मरणोत्तर जीवन हा विषय मानवाच्या सखोल भावनांशी बांधलेला आहे ही या क्षेत्रात वैज्ञानिक संशोधन करण्यात एक मोठी अडचण आहे. ''जन्माला येण्याची क्रिया करताना त्याचप्रमाणे मरण्याची क्रिया करताना 'अ' अस्तित्वातच नसेल तर 'अ'च्या जन्माची व मरणाची क्रिया घडेलच कशी'' अशी कोटी करुन पुनर्जन्म सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ही कोटी खरी मानली तर आत्माच कशाला? शरीरही जन्मू शकत नाही वा मरु शकत नाही. वरील वाक्यातच 'अ'च्या ऐवजी 'अ'चे शरीर असा शब्द घातला की झाले. पुनर्जन्माच्या सिद्धिसाठी अशा तऱ्हेच्या कोट्यांना देखील महत्व देण्यात येते. कारण मरणानंतर आपले सारे अस्तित्व नाहीसे होणार ही कल्पना काही लोकांना अत्यंत दु:सह वाटते.

आत्म्याच्या अमरत्वाबद्दल एक अधिक विचारार्ह युक्तिवाद आहे तो असा :-

मी रांगण्याइतका लहान असताना माझ्या शरीरात ज्या पेशी होत्या त्यापैकी आज एकही उरलेली नाही. पेशीच काय त्यावेळचे आज काय उरलेले आहे हेच सांगता येणार नाही. असे असून त्या वयातल्याही काही घटना मला आठवतात. तेव्हा त्या घटना अनुभवणारा त्यावेळचा मी व आज त्या आठवणारा आजचा मी एकच आहे व तो कालानुसार नष्ट होत नाही हे सिद्ध होते.

वरील युक्तिवादाला बौद्ध तत्वज्ञानातील क्षणभंगवादात उत्तर दिले आहे. स्मृतीची उत्पत्ती लावण्यासाठी कालातीत आत्म्याची कल्पना आवश्यक वा उपयुक्त देखील नाही. आत्मा मुळी बदलतच नसेल तर विशिष्ट स्मृती असलेला आत्मा व तशी स्मृती नसलेला आत्मा यांच्या गुणधर्मात काहीच फरक असणार नाही व त्यामुळे आत्म्याच्या नित्यत्वामुळे स्मृती होते असे म्हणताच येत नाही. अनुभवामुळे आत्म्याच्या गुणधर्मात फरक पडणे व या फरकामुळेच स्मृती होणे शक्य आहे. ज्याचे गुणधर्म असे सतत बदलत असतात त्या आत्म्याला नित्य कसे म्हणता येईल?

स्मृतीची उत्पत्ती बौद्धांनी दिलेल्या ज्योतीच्या दृष्टांताने लागते.

ज्योती जळत असताना प्रतिक्षणी तेलाचा नवीन बिंदू व वातीचा नवीन कण जळत असतो. पण तरी एका वातीची व पणतीची ज्योती आणि वेगवेगळ्या पणत्यातली ज्योती यात फरक करता येतो. पणतीत ज्या जातीचे तेल व कापूस असेल त्याच जातीच्या तेलाची व कापसाची सारी ज्योती असेल. कारण तेलाच्या एका बिंदूचा शेवटचा कण दुसऱ्या बिंदूच्या कणाला व कापसाचा जळणारा शेवटचा कण कापसाच्या नवीन कणाला पेटवूनच विझत असतो.

अशीच गोष्ट साखळी शर्यतीची आहे. या शर्यतीत प्रथम धावायला सुरुवात करणारा खेळाडू जवळ उभ्या असलेल्या खेळाडूच्या हातावर टाळी देतो व स्वतः थांबतो. तेव्हा दुसरा खेळाडू धावायला सुरूवात करतो. दुसरा तिसऱ्याच्या बाबतीत असेच करतो याप्रकारे धावणारे खेळाडू बदलत असले व शर्यतीच्या सुरूवातीपासून शेवटपर्यंत एकच असलेली कोणतीच गोष्ट नसली तरी सारी शर्यत एकच समजली जाते. प्रत्येक खेळाडूच्या वेगाने साऱ्या शर्यतीचा वेग निश्चित होतो.

आत्म्यामध्ये भासणारे सातत्यही याच प्रकारचे आहे. प्रत्येक अनुभव पुढच्या अनुभवावर ठसा उमटवून जात असतो. अशी ही कारणमालिका असते. अशी एक मालिका म्हणजे एक आत्मा. मालिका बदलली की आत्मा बदलला. तेव्हा या जन्माच्या पूर्वीच्या जन्माचे अनुभव व या जन्माचे अनुभव मिळून एक मालिका असेल तरच हा जन्म हा पुनर्जन्म आहे असे मानता येईल. **''पुनर्जन्म आहे पण त्याची स्मृती होऊ शकत नाही''** हा वदतोव्याघात आहे.

**पूर्वजन्माची स्मृती**

पुनर्जन्मावर विश्वास असणारे काही लोक अशी दोन जन्मांची एक मालिका असते याबद्दल पुरावा म्हणून एक उदाहरण देतात. एका स्त्रीला आपण पूर्वजन्मी झाशीची राणी होतो, त्यानंतरच्या जन्मात एक बंगाली स्त्री होतो असे दोन जन्म आठवत होते. त्या पूर्वीच्या व्यक्तीच्या आयुष्यात घडलेल्या ज्या गोष्टी या स्त्रीला माहीत असण्याचा सुतराम संबंध नव्हता त्या देखील तिला आठवत होत्या. उदाहरणार्थ, या स्त्रीला बंगाली मुळीच येत नसून देखील बंगाली जन्म आठवला की ती घडाघडा बंगाली बोलू लागे. बंगाली जन्मात तिने केलेल्या नवऱ्याच्या घराचा पत्ता ती सांगे. चौकशी करता ते घर सापडले. झाशीच्या राणीचा आत्मा जागृत झाला की कोणत्याही इतिहासात न लिहिलेल्या झाशीच्या राणीच्या एखाद्या अप्रसिद्ध नातलगाचा उल्लेख येई व मग तपास करता त्या नातलगाच्या वंशजांचा पत्ता लागे. आता या स्त्रीला माहीत नसलेल्या गोष्टी जर तिला आठवतात तर त्या पूर्वजन्मीच्या स्मृती आहेत असे का म्हणू नये? व याप्रमाणे पूर्वजन्म सिद्ध झाला तर प्लँचेटवर मृतात्मा येतो ही शक्यता कशी धुडकावून लावता येईल?

येथे हे सांगितले पाहिजे की या स्त्रीला मी स्वतः भेटलो नाही. वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या व तिला भेटलेले मानसशास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीच्या आधारे वरील मजकूर लिहिला आहे. दुसरा जन्म आठवण्यास **उन्मनी अवस्थेसारखी एखादी असामान्य अवस्था लागते. तसेच प्लँचेट चालू होण्यास मोहनावस्थेत जाण्याची आवश्यकता असते.** तेव्हा हे उदाहरण प्लँचेटचे प्रामाण्य धुडकावून लावणाऱ्यांनी विचारात घेण्यासारखे आहे.

अशा उदाहरणांची मुख्य अडचण अशी की विचाराधीन व्यक्तिला अमुक गोष्ट माहीतच नव्हती याची ग्वाही देणे जवळ जवळ अशक्य असते. या स्त्रीला बंगाली भाषा मुळीच येत नव्हती व तिचा बंगालशी काही संबंधच आला नव्हता, तसेच झाशीच्या राणीच्या नातलगांची उन्मनी अवस्थेत तिने दिलेली माहिती तिला जागृतावस्थेत नव्हती, हे खरे नाही असे सांगणारे शास्त्रज्ञ मला भेटले आहेत.

**एकूण मला उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून प्लँचेटने मृतात्म्याशी संबंध साधता येतो असे सिद्ध होते असे मला वाटत नाही.**

●

३८, हिंदुस्थान कॉलनी, अमरावती मार्ग,
नागपूर - ४४० ०१०.